RNI No. MAHBIL/2012/48433
www.dgps.maharashtra.gov.in.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक – पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - ४० ] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर ७ - १३, २०२१ / आश्विन १५ - २१, शके १९४३ [ पृष्ठे २०७

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय / संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mantralaya, Mumbai-400 032
Dated 14th September 2021

**Notification**

No. SPP-3718/791/CR 174/D-XIV.— The Government of Maharashtra hereby cancels the appointment of Adv. Shri. Mahesh B. Shinde, as "Special Public Prosecutor" for condusting Session Case No. 38/2016, pending before Addl. Sessions Court, Malshiras, Solapur which is arising out of C. R. No. 326/2016, registered at Akluj Police Station, district Solapur made *vide* Government Notification No. SPP-3718/791/CR-174/D-XIV, dated 7th January 2019 with immediate effect.

*By Order and in the name of the Governor of Maharashtra,*

**VAISHALI P. BORUDE,**
Section Officer,
Law and Judiciary Department.

—————————

### जिल्हाधिकारी यांजकडून

**जिल्हा पुणे**

*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ नुसारच्या (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१८ अन्वये कलम १९ चे पोट-कलम (१) अन्वये घोषणा पत्र.*

***घोषणा पत्र***

क्रमांक पीएलबी/कावि-४६१/२०/कावि-२९९/एसआर-०२/२०२१.--ज्याअर्थी, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, पुणे यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश

"उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोटकलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक पीएलए/मेट्रो/कावि-३३/२०२१, दिनांक २७ जानेवारी २०२१ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-एक पुणे विभागीय पुरवणी मध्ये दिनांक २८ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०२१ रोजी प्रसिद्ध करणेत आली आहे ; आणि याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, पुणे यांनी कलम १५ च्या पोटकलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे आणि ज्याअर्थी, मुख्य अभियंता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे तथा संपादन मंडळ यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक EG/भुजि काप/०७.२१/प्र. क्र. ८३/६६३/शाखा-२, दिनांक १७ ऑगस्ट २०२१ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ११ *(१)* अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या जमिनीपैकी फायनल प्लॉट नंबर ६/न.भू.क्र. १६१२, क्षेत्र ४०८.७७ चौ. मी., आवश्यक जागेमध्ये कोणताही बदल नाही आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ चे पोटकलम *(१)* च्या तरतुदींन्वये, या अधिसूचनेच्या अनुसूची-दोनमध्ये नमूद उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये वर्णन केलेप्रमाणे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाही म्हणून बाधित पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चारमध्ये वर्णन केलेला नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे, जिल्हा पुणे, पत्ता-जुनी जिल्हा परिषद इमारत, ३ रा मजला, पुणे-४११ ००१ यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

## जमिनीचे वर्णन

## जिल्हा पुणे, तालुका पुणे शहर, मौजे भांबुर्डा

| अ. क्र. | सर्व्हे नंबर/ फा. प्लॉट नंबर | नगर भूमापन क्रमांक | अंदाजित क्षेत्र | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २ | ३ | ४<br>चौ मी. | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | ६ | १६१२ | ४०८.७७ | ७ पैकी | ६ पैकी | रस्ता | ६ पैकी |

## अनुसूची - दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :** हिंजवडी ते शिवाजीनगर, पुणे मेट्रो लाईन-३ या प्रकल्पातील मेट्रो स्टेशनचे मार्गिकेकरिता.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन** : विशेष सार्वजनिक वाहतुकीचा पायाभूत सुविधा प्रकल्प.

**समाजाला मिळणारे लाभ** : हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गावरील सार्वजनिक वाहतूक सुरळीत व जलद गतीने होण्यास मदत होणार आहे.

## अनुसूची - तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

## जिल्हा पुणे,

## तालुका पुणे शहर, मौजे भांबुर्डा

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|

उक्त सार्वजनिक प्रयोजनामुळे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाहीत.

सबब, पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन निरंक असे.

**अनुसूची - चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश वर्णन निरंक असे.

**टीप :** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे, पत्ता : जुनी जिल्हा परिषद इमारत, तिसरा मजला, पुणे-४११ ००१ येथे निरीक्षण करता येईल.

**डॉ. राजेश देशमुख,**
(भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, ४ ऑक्टोबर २०२१.

---

**नगराध्यक्षा यांजकडून**

**तळेगाव दाभाडे नगरपरिषद**

*महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल.*

***जाहीर सूचना***

तदानप/क्रमांक ०६/४६४३/२०२१.--ज्याअर्थी, तळेगाव शहराची द्वितीय सुधारित विकास योजना महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने क्रमांक टीपीएस-१८१३/१०१०/प्र.क्र. २०३/१३/वि.यो. मंजुरी/नवि-१३, अन्वये दिनांक २७ मे २०१३ अन्वये मंजूर केली असून दिनांक १९ डिसेंबर २०१३ पासून अमलात आली आहे आणि ज्याअर्थी, तळेगाव शहराच्या वगळलेल्या भागाची (ईपी) द्वितीय सुधारित विकास योजना महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचे क्रमांक शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१८१४/८२/प्र.क्र. २५/१४/नवि-१३, दिनांक ७ एप्रिल २०१५ अन्वये मंजूर केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे तळेगाव दाभाडे, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथील तळेगाव दाभाडे नगरपरिषद हद्दीतील आरक्षण क्रमांक ५०-" म्युनिसिपल स्टाफ क्वॉर्टर्स " या आरक्षणातील कैकाडी समाज बांधवांचे राहते घरांच्या जागेवरील आरक्षित क्षेत्र वगळून सदर क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणे.

असा फेरबदल करणेस व त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ *(१)* अन्वये कार्यवाही करणेस तळेगाव दाभाडे नगरपरिषद मा. सर्वसाधारण सभेकडील अनुक्रमे ठराव क्रमांक १५/३, दिनांक २२ जानेवारी २०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, अशी अधिसूचना जाहीर करण्यात येते की, ज्या नागरिकांना वरील नियोजित फेरबदलाबाबत सूचना/हरकत असल्यास त्यांनी आपल्या लेखी सूचना/हरकती ही सूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात (गॅझेट) प्रसिद्धी झालेपासून एक महिन्याचे आत मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, तळेगाव दाभाडे या नावाने सादर करावयात, मुदतीनंतर आलेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. सदर फेरबदलाबाबतचा नकाशा तळेगाव दाभाडे नगरपरिषद कार्यालयात (नगर रचना विभाग) जनतेच्या अवलोकनार्थ सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पाहवयास उपलब्ध आहेत.

**सौ. चित्राताई संदीप जगनाडे,**
नगराध्यक्षा,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद.

पुणे (तळेगाव दाभाडे), १ ऑक्टोबर २०२१.

---

## BY PRESIDENT MUNICIPAL COUNCIL

**Talegaon Dabhade Municipal Council,**

*Modification under Section 37 of Maharashtra Town Planning Act 1966*

***Public Notice***

तदानप/क्रमांक ०६/४६४३/२०२१.–Whereas Urban Development Department, Government of Maharashtra has sanctioned the Second Revised Development Plan of Talegoan Dabhade Municipal Council,